आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२२ सप्टेंबर २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ७२व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण समारंभात ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग 'दादासाहेब फाळके पुरस्कारा'नं सन्मानित /आर्टिकल ३७० ला सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म'चं सुवर्णकमळ, तर ‘भंगार’ या मराठी चित्रपटाला सर्वोत्कृष्ट नॉन-फीचर फिल्मचा पुरस्कार

- अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातल्या सुधारणांना आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

- राज्यसभेच्या ११ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकांची घोषणा, महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांसाठीही निवडणूक जाहीर

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धांमधे भारताच्या महिला क्रिकेट संघानं पटकावलं सुवर्णपदक

**<><><><><>**

७२व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं वितरण आज गुजरातच्या एकता नगर इथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आलं. भारतीय चित्रपटांची सांस्कृतिक शक्ती आणि वैविध्य राष्ट्रपतींनी यावेळी अधोरेखित केलं. चित्रपट हे प्रेक्षकांचं केवळ मनोरंजन करत नाहीत, तर देशभरातल्या विविध भागांतल्या नागरिकांना जोडतात, आणि भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा पडद्यावर दाखवतात, असंही त्या म्हणाल्या. या कार्यक्रमात एकूण ९२ पुरस्कार विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

## ***होल्ड... व्हीसी-***

(भारतीय चित्रपटसृष्टीत पाच दशकांहून अधिक काळासाठीच्या अतुलनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना २०२४ च्या प्रतिष्ठित 'दादासाहेब फाळके पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आलं. आर्टिकल ३७० चित्रपटाला सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म'चं सुवर्ण कमळ प्रदान करण्यात आलं. 'स्वातंत्र्य वीर सावरकर' या चित्रपटासाठी रणदीप हुडा यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पणाचा पुरस्कार मिळाला, तर नाग अश्विन सिंगीरेड्डी यांच्या कल्की २८९८ एडी या चित्रपटाने 'संपूर्ण मनोरंजनासह सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपट' हा पुरस्कार जिंकला. तमिळ चित्रपट 'अमरन' साठी राजकुमार पेरियासामी यांना 'सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन' पुरस्कार मिळाला. तसेच, '३५- चिन्ना कथा काडू' या तेलुगू चित्रपटाने 'सर्वोत्कृष्ट बालचित्रपट' पुरस्कार जिंकला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार ब्रह्मयुगमसाठी ज्येष्ठ अभिनेता मामुटी आणि चंदू चॅम्पियनसाठी अभिनेता कार्तिक आर्यन यांना विभागून देण्यात आला. यामी गौतम हिला आर्टिकल ३७० साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. भक्षक या चित्रपटासाठी संजय मिश्रा यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला. नॉन-फीचर विभागात, भंगार या मराठी चित्रपटाने सर्वोत्कृष्ट नॉन-फीचर फिल्मचा पुरस्कार जिंकला, तर दिग्दर्शक आनंद एल. राय यांना 'स्टॅच्यू ऑफ युनिटी - एकता का प्रतीक' या कलाकृतीसाठी 'सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन' पुरस्कार मिळाला. गायक अभय जोधपूरकर याला घरत गणपती या चित्रपटातल्या गाण्यासाठी सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.)

**<><><><><>**

अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यात २०१८मध्ये केलेल्या सुधारणांना आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळून लावली. या कायद्यामुळे इतर जातींच्या नागरिकांबरोबर उलट भेदभाव होत असल्याचा याचिकाकर्त्याचा युक्तिवाद सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठानं नाकारला. या कायद्यांतर्गत प्रथमदर्शनी गुन्हा घडला आहे की नाही, हे तपासण्यासाठी न्यायालयांच्या अधिकारांसह पुरेशा तरतुदी आधीच आहेत, असं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं.

**<><><><><>**

राज्य सरकारकडे आलेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे येत्या शनिवारपूर्वी दुष्काळाची पहिली अधिसूचना जारी केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना सांगितल. उद्यापासून पंचनामे सुरू करण्याचे आदेश प्रशासनाला दिल्याची माहिती त्यांनी दिली.

स्थानिक पातळीवरून येणाऱ्या माहितीच्या आधारे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केली असल्याचंही

मुख्यमंत्र्यांनी सांगितल. प्रसंगानुरूप निर्णय घेण्याचे सर्वाधिकार उपसमितीला असतील. याबाबतची अधिसूचना येत्या शनिवारपर्यंत काढली जाणार आहे.

कृषि विभागाचा सुधारित आकृतीबंध रद्द करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सन २००९चा मंजूर आकृतिबंध तात्पुरत्या काळासाठी कायम राहणार आहे.

मुंबई मेट्रो मार्ग ४, ४ अ, आणि १० प्रकल्पाच्या एकात्मिक कार शेड डेपो करता जमीन दिलेल्या मौजे मोघरपाडा इथल्या प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना मालकी हक्कानं विकसित भूखंड वाटप करायलाही या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

**<><><><><>**

पाण्याचा विवेकी वापर, जतन आणि प्रभावी व्यवस्थापनाची गरज उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आज अधोरेखित केली. नवी दिल्लीत नवव्या भारतीय आंतरराष्ट्रीय जल सप्ताहाचं उदघाटन करताना ते बोलत होते. हवामान अनुकूल जल व्यवस्थापन ही यंदाच्या कार्यक्रमाची संकल्पना आहे. पाण्याच्या समस्येशी लढा देताना अधिक सहकार्याची आवश्यकता असल्याचं त्यांनी सांगितलं. या कार्यक्रमात नेदरलँड्स आणि जर्मनी हे देश भागीदार म्हणून सहभागी झाले आहेत तसंच जागतिक जल व्यवस्थापन क्षेत्रातले अग्रणी, धोरणकर्ते, संशोधक, तज्ज्ञ यांच्यात या कार्यक्रमात विशेष चर्चा होणार आहेत.

**<><><><><>**

निवडणूक आयोगानं आज राज्यसभेच्या ११ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकांची घोषणा केली. यामध्ये उत्तर प्रदेशातल्या १० आणि उत्तराखंडातल्या एका जागेचा समावेश आहे. आयोगानं पश्चिम बंगालमधल्या राज्यसभेच्या एका जागेसाठी पोटनिवडणुकीचीही घोषणा केली आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया या महिन्याच्या २९ तारखेला सुरू होईल आणि १६ ऑक्टोबर रोजी मतदान होईल.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या पाच जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. औरंगाबाद, पुणे आणि नागपूर या तीन विभागीय पदवीधर मतदारसंघांसह अमरावती आणि पुणे विभागीय शिक्षक मतदारसंघासाठी, येत्या २३ ऑक्टोबरला सकाळी ८ ते दुपारी ४ या कालावधीत मतदान होईल. तर, २७ ऑक्टोबरला मतमोजणी आणि निकाल जाहीर केले जातील. या पाच जागांच्या निवडणुकांसाठी ६ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करता येतील.

<><><><><>

जपान इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारताच्या महिला क्रिकेट संघानं सुवर्णपदकावर नाव कोरलं. या स्पर्धेतलं भारताचं हे पहिलंवहिलं सुवर्णपदक आहे. या आणि इतर क्रीडाप्रकारांमध्ये भारताच्या आजच्या कामगिरीबद्दल अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-***

(आज झालेल्या अंतिम क्रिकेट सामन्यात भारतानं श्रीलंकेचा १४७ धावांनी धुव्वा उडवला आणि सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेचं सुवर्णपदक पटकावलं. नाणेफेक जिंकून फलंदाजीला उतरलेल्या भारताच्या संघानं निर्धारित २० षटकांत ३ खेळाडूंच्या मोबदल्यात २१६ धावांचा डोंगर रचला. स्मृती मंधानानं ७९, ऋचा घोषनं ४९, तर शफाली वर्मानं ४८ धावा फटकावल्या. प्रत्युत्तरादाखल उतरलेला श्रीलंकेचा संघ संपूर्ण संघ अवघ्या ६९ धावांमध्ये गारद झाला. दीप्ती शर्मानं ३, तर शफाली वर्मा, श्रेयांका पाटील आणि श्री चरणी यांनी प्रत्येकी २ खेळाडूंना बाद केलं.

वुशू या क्रीडाप्रकारात भारताच्या रोशिबिना देवी हिनं महिलांच्या ६० किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आणि भारतासाठी आणखी एक पदक निश्चित केलं. हे तिचं सलग तिसरं आशियाई पदक असेल. तिचा पुढचा सामना उद्या होईल. तर पुरुषांच्या ५६ किलो वजनी गटात आर्यन यानंही उपांत्यपूर्व फेरी गाठली.

टेबलटेनिसमध्ये महिला संघानं थायलंडवर विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीतलं स्थान निश्चित केलं, मात्र पुरुष संघाला दक्षिण कोरियाकडून पराभव पत्करावा लागला.

बॉक्सिंगच्या मैदानात पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात जदुमनी सिंह यानं उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. महिलांच्या गटात साक्षी चौधरी हिनंही उपउपांत्यपूर्व फेरी गाठली. जिम्नॅस्टिक्समध्ये प्रणती नायक हिनं वॉल्ट प्रकारात अंतिम फेरीतलं स्थान निश्चित केलं.)

<><><><><>

सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडण्यावर मुंबई उच्च न्यायालयानं पूर्ण बंदी घातली आहे. धार्मिक मिरवणुकींमध्ये लाऊडस्पीकर, डीजे आणि लेझर बीम्सचा वापर पूर्णपणे अनावश्यक असल्याचं निरीक्षण, न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी आणि

न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठानं नोंदवलं आणि हे आदेश दिले. ध्वनिप्रदूषण आणि वायूप्रदूषण न करताही सण साजरे करता येतात, असं मत न्यायालयानं वयक्त केलं. लाऊडस्पीकर्स आणि फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रचंड ध्वनी आणि वायूप्रदूषणाची मुंबई उच्च न्यायालयानं काल स्वतःहून दखल घेतली आणि जनहित याचिका दाखल करून घेतली होती.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक गेंडा दिनानिमित्त देशातल्या एकशिंगी गेंड्यांचा उलेख करत त्यांच्या संरक्षणासाठी काम करणाऱ्या सर्वांचं कौतुक केलं आहे. जगातल्या एकूण गेंड्यांच्या संख्येपैकी सुमारे ८० टक्के गेंडे आसाममध्ये राहतात, असं त्यांनी समाज माध्यमवरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या विशाखा राऊत यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवक पदावरून त्यांना हटवल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं आज नोटिस जारी केली. त्यांच्या जात प्रमाणपत्राबद्दलची याचिका अपीलीय प्राधिकरणासमोर प्रलंबित असेपर्यंत त्यांच्या वॉर्डातलं नगरसेवकपद रिक्त ठेवावं, असंही न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठानं सांगितलं.

**//<><><><><>//**